# जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टीम (ZPFMS)

➢शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर २०२० नुसार माहे जुलै २०२१ पासुन सोलापूर जिल्हा परिषदमध्ये जि.प. स्तरावर सदरच्या प्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

➢सदरची प्रणाली ग्रामविकास विकास विभागामार्फत नियंत्रीत करण्यात येते.

➢माहे एप्रिल २०२३ पासुन सदरची प्रणाली पंचायत समिती स्तरावर अंमलात आलेली आहे.

➢सदरच्या प्रणालीमध्ये प्रशासकिय मान्यता आदेश व प्राप्त निधीच्या नोंदी घेतल्याशिवाय देयके तयार करता येत नाहीत. परिणामी खर्चाचे लेखाशिर्ष चुकणे, कमी किंवा जादा आदाई होणे इत्यादी गोष्टींसाठी प्रतिबंध बसलेला आहे.

➢सदरच्या प्रणालीतुन जिल्हा परिषदेतील व पंचायत समिती सर्व देयके मार्गक्रमित होत असुन सदरच्या प्रणालीतुन सर्वप्रथम मेकर देयक जनरेट करुन ऑडीटर यांचेकडे परिक्षणासाठी सादर करतात. तदनंतर ऑडीटर देयके विभागप्रमुख यांचेकडे मंजुरीसाठी सादर करतात. देयके मंजुर झाल्यानंतर वित्त विभागास सादर करण्यात येतात. वित्त विभागामध्ये ऑडीटर यांचेकडे देयके तपासुन सहाय्यक लेखाधिकारी, लेखाधिकारी, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेमार्फत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे मंजुरीस्तव सादर केले जातात.

➢सदर प्रणालीमध्ये एकदाच बेनिफिसरी तयार करावा लागतो. तालुका स्तरावर शिक्षक वेतन व सर्व निवृत्तीवेतन यामधुनच आदा केली जातात.

➢तदनंतर मंजूर देयकांचे इनव्हाईस तयार केलेनंतर Mahapay च्या माध्यमातुन RTGS द्वारे संबंधितांना अदा केले जाते.

# ऑनलाईन निवृत्तीवेतन प्रणाली

## SYSTEM OF PENSION ILLUSTRATION (SOPI)

**1. प्रत्येक कार्यालयातुन निवृत्तीवेतन प्रकरणे ऑनलाईन सादर करणे**

**2. कार्यालयातुन सादर करण्यात आलेले ऑनलाईन प्रकरण खाते प्रमुखांमार्फत वित्त विभागाकडे तपासुन सादर करणे.**

**3. निवृत्तीवेतन तपासणी सुची ऑनलाईन तयार करणे**

**4. निवृत्तीवेतन विषयक सर्व फॉर्म संच ऑनलाईन तयार करणे**

**5. प्रत्येक कार्यालयास निवृत्तीवेतन प्रकरणाची सद्यस्थिती ऑनलाईन दर्शविणे.**